
हिमालयात अशी अनेक गावं आहेत, जिथे पोचायचं म्हणजे एक-दोन डोंगर चालत पार करावे लागतात. त्या गावांकडे जायला धड रस्ताही नसतो; पण तिथे असं काही तरी असतं जे आपल्याला तिथे ओढून नेतं.
अशाच एका गावाची गोष्ट.

गुरुदास नूलकर

# एका अद्भुत गावाची गोष्ट





▶ ''कधी येणार हे मोहना?'' आमच्या ग्रुपमधल्या शाळकरी मोनालीने अखेर विचारलंच.
आम्हाला चालायला लागून तीन तास झाले होते आणि सगळीच मंडळी जरा थकल्यासारखी दिसत होती. आम्ही गढवाल हिमालयात चक्राता तेहसील भागात होतो. नोव्हेंबर महिना. दुपारी तीनची वेळ. वारं गार असलं तरी डोक्यावर ऊन जाणवत होतं. नकाशावरही चटकन सापडणार नाही इतक्या छोट्या मोहना नावाच्या गावाच्या दिशेने आम्ही चालत होतो. आमच्या या ग्रुपमध्ये काही शाळकरी मुलं-मुली होती, तर काही तरुण मंडळी.
''हे वळण ओलांडलं की दिसेल बघ गाव.'' कुणी तरी मोनालीची समजूत काढण्यासाठी म्हणालं. आणि खरंच, उतार वळण संपताच एका देखण्या गावासमोर आम्ही येऊन ठेपलो.

गावं कसलं, शंभरेक घरांची वस्ती होती ती. ''नमस्ते!'' दुपारच्या उन्हामुळे लालबुंद झालेल्या गोंडस मुलांनी आमचं स्वागत केलं. ही पोरं शाळेतून घरी परतत होती. ''नमस्ते! आप मोहना के हो?'' आमच्यातल्या एकाने विचारलं. ''हाँ जी, हम मोहना के हैं। और आप?'' त्यांतल्या एका चुणचुणीत मुलाने आम्हाला प्रतिप्रश्न केला. आम्ही महाराष्ट्रातून त्यांचं गाव बघायला आलोय हे कळताच त्यांतली दोन मोठी मुलं सुसाट गावाकडे पळाली. उरलेल्या मुलांनी रस्ता दाखवत आमच्यासोबत गावाच्या दिशेने चालायला सुरुवात केली. गावाच्या वेशीवर चार-दोन मोठी माणसं आमच्या स्वागतासाठी येऊन थांबली होती. पुढे गेलेल्या मुलांनी गावकऱ्यांना आमच्या येण्याची खबर दिली होती तर!

डोंगर उतारावर वसलेल्या या टुमदार गावाचं नाव मोहना का ठेवलं असेल हे आम्हाला पाहताक्षणी कळलं. छोटी पण देखणी घरं. देवदार लाकडाचे नक्षीदार खांब. त्यावर उभी एक माडी आणि वर पातळ दगडांची कौलं. मातीने सारवलेलं अंगण. बाजूला शेतं, चरणारी गुरं आणि प्रसन्न चेहऱ्याचे गावकरी, असं दृश्य आमच्या पुढ्यात होतं. या गावात पोहोचायला एकही रस्ता नाहीये. आहेत त्या फक्त दोन पायवाटा. चक्राता हे सगळ्यात जवळचं मोठं गाव. तिथे जाण्यासाठी आधी पाऊण तास डोंगर उतरून ग्वासा गावात पोहोचायचं. तिथे मिळालं तर वाहन घ्यायचं किंवा तसंच चालत चक्राताला जायचं. परतीच्या प्रवासातही ग्वासापासून पुन्हा पाऊण-एक तासाची चढण!

अशा दुर्गम ठिकाणामुळे साहजिकच इथल्या घरांमध्ये वॉशिंग मशिन किंवा फ्रिजसारखी मोठी उपकरणं तर सोडाच, पण गॅसही नाही. गावात वीज आहे, पण बेभरवशाची. तसं बघितलं तर हिमालयात कशाचाच भरवसा नाही. रस्ता आज आहे, तर उद्या दरड कोसळून तो नाहीसा झालेला असू शकतो. आता लख्ख ऊन असेल तर क्षणात पाऊस पडू शकतो. थोडं उबदार वाटायला लागतं ना लागलं तोच ढग येऊन थंडगार हवा वाहू लागतं. अशा प्रतिकूल परिस्थितीत आणि इतक्या उंचीवर माणसं का राहतात याचं आम्हाला कुतूहल वाटत होतं.

''ए, हा व्ह्यू बघ कसला भारी आहे!'' अनिकेत डोळ्याला कॅमेरा लावून म्हणाला. समोर खोल दरी आणि पुढे एकामागे एक पर्वताच्या पाच रांगा होत्या. मोहनातील सर्व घरं याच दृश्याकडे बघत उभी होती. आमचा हा ग्रुप सह्याद्री पर्वतात बराच हिंडलाय, पण तिथे असं दृश्य बघायला मिळणं शक्य नव्हतं. या दोन पर्वतरांगांमध्ये खूप फरक आहे. त्यांची उत्पत्तीही वेगळी आहे. सह्याद्री पर्वतरांगा ज्वालामुखीच्या उत्सर्गातून तयार झाल्या आहेत, तर पृथ्वीच्या पृष्ठभागावरील दोन टेकटॉनिक प्लेट्सची टक्कर झाल्याने हिमालय तयार झाला आहे. लाखो वर्षांपूर्वी भारताची प्लेट युरेशियन प्लेटला धडकली. यामुळे उचलला गेलेला भाग म्हणजे हिमालय पर्वत. आजही या दोन प्लेट्स एकमेकींत घुसत आहेत आणि हिमालय उंच होत चालला आहे. त्यामुळे हिमालयाची उंची सह्याद्रीपेक्षा कित्येक पट जास्त आहे. जगातलं सर्वोच्च शिखर एव्हेरस्ट (उंची ८८४८ मीटर) हिमालयातच आहे ना! सह्याद्रीतील सर्वांत उंच शिखराची, कळसूबाईची उंची १६४६ मीटर आहे, तर मोहना गाव साधारण २१०० मीटरवर.





**गावातील वेगळी चूल आणि उखळ.**

इथल्या दऱ्या अफाट खोल आहेत आणि उतार तीव्र. सपाट जागा नाहीच कुठे. डांबरी रस्तेही कमी. आणि एका गावातून दुसऱ्या गावात जायचं म्हणजे दोन-चार चढ-उतार लागणारच. बसॉल्ट दगडाचा सह्याद्री एकदम भक्कम आहे, तर धडकेतून उचलला गेलेला हिमालय जणू एक ठिसूळ ढीग आहे. इथे सतत कडे ढासळत असतात आणि रस्त्यावर दरडी कोसळत असतात. घरं बांधताना हे ध्यानात ठेवावं लागतं. हिमालयातील गावं सौम्य उतार आणि पाण्याचा स्रोत जवळ असेल असं बघून वसलेली असतात.

गावात पोचल्यावर आमच्यापैकी काहींचं लक्ष आसपासच्या झाडाझुडपांकडे गेलं. अश्विन वनस्पतींची नावं लिहू लागला. तीव्र उतारावर पाण्याचं दुर्भिक्ष असतं. जोरात वाहणाऱ्या पाण्यामुळे मातीही कमी असते. शिवाय थंडीत सगळा परिसर बर्फाने आच्छादला जातो. या परिस्थितीत काही ठराविक वनस्पतीच तग धरू शकतात. त्यात सूचिपर्णी आणि रुंद पानांचे वृक्ष असतात. देवदार, चीड पाइन, ब्लू पाइन, स्प्रूस, युव आणि जुनिपर असे सूचिपर्णी वृक्षांमधले प्रकार आम्हाला दिसत होते. रुंदपर्णी झाडांत दोन प्रकारचे. ऱ्होडोडेंड्रॉन, बनू, मोरू आणि खरसू ही ओक प्रकारातली झाडं. तसंच मेपल, हॉर्स चेस्टनट, बर्च आणि इतरही काही झुडपं आम्हाला आढळली.

या भागात प्रामुख्याने जौंसारी या समाजाची वस्ती आहे. हा समाज पांडवांच्या काळापासून इथे आहे असं मानलं जातं. स्वाती ही आमच्यातली भाषातज्ज्ञ. ती गावकऱ्यांचं संभाषण ऐकत उभी होती. ते कोणती भाषा बोलताहेत हे ओळखण्याचा तिचा प्रयत्न अपयशी ठरला. तिने विचारल्यावर कळलं, की त्यांच्या या बोलीभाषेचं नावही जौंसारी असंच आहे. इथल्या शाळेतही हिंदी आणि जौंसारी भाषेतून शिक्षण दिलं जातं. या समाजात दसरा, दिवाळी, संक्रांत, बैसाखी हे सण साजरे केले जातात.

आमच्या ग्रुपमधले धृवांग आणि सुवर्णा हे आर्किटेक्ट्स. त्यांचं सगळं लक्ष इथल्या घरांकडे होतं. त्यांच्यामुळे आम्हीही लक्ष देऊन घरांच्या रचनेकडे बघू लागलो. मग जाणवलं, की इथली घरं एकमेकांना अगदी चिकटून बांधलेली आहेत. सुवर्णा म्हणाली, ‘‘त्यामुळे या घरांमध्ये आणि एकूणही गावाच्या परिसरात ऊब



**मोहना गावातून दिसणारा हिमालयाचा नजारा**




**स्लेट दगडांची कौलं घातलेली घरं आणि गावाजवळची शेती. या शेतांना टेरेस म्हणतात.**

राहत असणार.'' गावात फेरफटका मारता मारता आम्ही एका घरात शिरलो. ते अजयसिंह चौहान यांचं घर होतं. त्यांनी प्रेमाने आमचं स्वागत केलं आणि आम्हाला फिरून घर दाखवलं. इथे रात्रीच्या वेळेस वर्षभर थंडी असते. त्यामुळे ऊब आणण्यासाठी घरात लाकडाच्या फळ्यांचीच जमीन केलेली होती. अजयजींनी आम्हाला तळमजल्यावर मागच्या बाजूला नेलं. तिथे गुरं-शेळ्या-मेंढ्यांसाठीही अशीच एक उबदार खोली होती. त्यांनाही थंडीपासून संरक्षण हवंच की! तिथेच चारा साठवला होता.

मोहनातली बहुतेक घरं दुमजली होती. अजयजींच्या घरात पहिल्या मजल्यावर स्वयंपाकघर, एक मोठी खोली आणि अन्नधान्य साठवणीसाठीची एक वेगळी खोली होती. अंगणात उखळ, जातं अशी काही अवजारं होती. अजयजींनी सांगितलं, की, 'घराच्या प्रत्येक भागासाठी विशिष्ट झाडाचं लाकूड वापरलं जातं. घराचे दरवाजे खरसूच्या भक्कम लाकडाचे असतात. फरशी देवदार किंवा पाइनच्या लाकडाची, तर फर्निचर देवदार किंवा बनूच्या लाकडाचं असतं.' छपरावर स्लेट दगडाची कौलं असतात. हे दगड याच परिसरात मिळतात. आपल्याकडे पूर्वी स्लेटच्या पाट्या असायच्या. त्या इथूनच येत असणार! एकूण, घर बांधण्यासाठीचं सगळं साहित्य आसपासच्या परिसरातलंच होतं.

घराच्या ओसरीत जळणाचं लाकूड ठेवलं होतं. अजयजींनी सांगितलं, की 'प्रत्येक गावाला सरकारकडून एक वन दिलेलं असतं. त्यातून गावकऱ्यांच्या गरजा भागवल्या जातात. गुरांना खाद्य, औषधी वनस्पती, जळणाचं लाकूड, खतासाठी पालापाचोळा अशा नाना गोष्टी जंगलातून मिळतात. त्यामुळे या जंगलाची काळजीही घेतली जाते. एखादा वठलेला वृक्ष पडला की त्याचं लाकूड कोणत्या कुटुंबाला द्यायचं हे गाव एकत्र येऊन ठरवतं. ते कुटुंब त्यापासून घराची डागडुजी किंवा विस्तार, लाकडी फर्निचर, अवजारं अशा गोष्टी तयार करतं. या पद्धतीमुळे जंगल ओरबाडलं जात नाही. गावाच्याच पुढच्या गरजांसाठी ते सुरक्षित राहतं.

मोहनात राहणाऱ्यांमध्ये नोकरी करणारं कोणीच नाही. कारण या गावातून नोकरीच्या गावी ये-जा करणं अशक्य आहे. मोहनातल्या काही कुटुंबांमधले लोक नोकऱ्या करतात. त्यांचा मुक्काम कलसी, विकासनगर किंवा डेहराडूनला असतो. मोहनात प्रत्येकाकडे शेती आहे आणि काही गुरं. गावाभोवती छोटे सपाट टप्पे करून शेत तयार केलेलं असतं. त्यांना टेरेस म्हणतात. त्यात साधारण सहा महिने शेती चालते. इथे घरातल्या प्रत्येकाला कष्ट करावे लागतात. मुलांना छोटी-मोठी कामं तर असतातच, पण शाळेत जायचं म्हटलं तरी बरंच चालावं लागतं. मोठ्या माणसांना तर काय, कामच काम! मोहनाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथे अजूनही काही प्रमाणात वस्तूंची देवाणघेवाण (बार्टर) चालते. एखाद्या कुटुंबाकडे दूध जास्त असेल आणि दुसऱ्याकडे राजमा, तर त्यांची देवाणघेवाण होते. त्यामुळे पैशावाचून अडून राहत नाही. अर्थात चक्रातामध्ये खरेदी करायची असेल तर पैसा लागतोच. शेतीतलं उत्पादन चक्राताच्या बाजारात विकून पैसे मिळतात. शेतीव्यतिरिक्त जंगलातूनही थोडंफार उत्पन्न मिळतं. पाइन झाडांपासून टरपेन्टाइन तेल बनवलं जातं. बिमल झाडापासून उत्तम प्रतीचा दोर बनवतात.



**गावातल्या अनेक घरात माडीवरच्या एका कप्प्यात मधमाशीपालन केलं जातं.**

त्याला चांगला भाव मिळतो. इथे काही वनौषधी विकल्या जातात.

फिरत फिरत आम्ही गावालगतच्या शेतांमध्ये पोचलो. हिमालयाच्या भौगोलिक परिस्थितीत शेती सोपी नाही. इथे पिकांचं वैविध्यही कमी. अरबी, बटाटा, राजमा, राजगिरा, टोमॅटो, मिरची, कोबी, मटार अशी पिकं इथे होतात. ती इतर पिकांसोबत तसंच आलटून पालटून घेतली जातात. त्यामुळे जमिनीचा कस टिकून राहतो. रासायनिक खतं आणि औषधं महाग असल्याने त्यांचा वापर कमी आहे. शेण आणि बनूच्या पाल्यापासून उत्तम खत तयार होतं. काही वनस्पतींपासून कीटकनाशक केलं जातं.

घरोघरी उन्हात वाळवलेलं मांस टांगून ठेवलेलं होतं. याचा उपयोग थंडीत होतो. दूध आणि अंडीही घरच्या घरीच मिळतात. एक गमतीशीर गोष्ट म्हणजे काही घरांत मधमाशीपालन केलेलं होतं. त्यामुळे मध तर मिळतोच; पण मधमाश्या परागीभवन (पॉलिनेशन) करून शेतीचं उत्पादन वाढवतात. त्यांच्या पोळ्यासाठी घराच्या माडीत एक कप्पा केलेला असतो. यातून उत्तम प्रतीचा औषधी मध मिळतो. पूर्वी जेव्हा साखर मिळत नसे तेव्हा गोड पदार्थात मधाचाच वापर होत असे. धान्याचं पीठही गावातल्या गावात केलं जातं. त्यासाठी ओढ्यावर एक पाणचक्की असते. विजेचा वापर न करता या चक्कीतून दळण मिळतं. एकूण काय, तर मोहनातल्या रहिवाशांचा संपूर्ण आहार स्वकष्टांतूनच तयार होतो.

हिवाळ्यात मोहनामध्ये बर्फ पडतो आणि थंडी असह्य होते. आम्हाला प्रश्न पडला, की ते तीन महिने गावकरी करतात काय? त्यांच्या उत्तराने आम्ही थक्क झालो. हिवाळ्यात ही मंडळी चक्क गाव बदलतात. इथे प्रत्येक गावाला कमी उंचीवर वसलेली एक ‘छानी’ असते. छानी म्हणजे थंडीतील वस्तीचं गाव. मोहनाच्या छानीचं नाव खोया-छानी. इथेही प्रत्येकाचं घर आणि शेती असते. मोहनापेक्षा कमी थंडी असल्याने हिवाळ्यात आपल्या गुराढोरांसकट ते इथे येतात आणि तीन महिने शेती करतात. सामान आणि गुरं घेऊन खोया-छानीला पोचायला दोन तास उतरावं लागतं. मग नऊ महिने बंद असलेलं घर आधी साफ करायचं, डागडुजी करायची, शेतातील तण काढायचे, जनावरांच्या चाऱ्याची सोय





**मोहना गावातली ओढ्यावरच्या पाण्यावर चालणारी पाणचक्की. आणि त्या चक्कीसाठी उभारलेलं खोपटं**

करायची आणि मग शेतीला लागायचं. इथे भात, मोहरी, आलं, मका, लसूण अशी पिकं घेतली जातात. थंडी ओसरली की ते पुन्हा आपल्या मूळ गावाकडे परततात.

बाप रे, केवढे कष्ट! आज शाळेत शिकणारी मोहनातली मुलंही उद्या मोठी होऊन हेच सगळं करतील की ती या गावातून बाहेर पडतील? काही पोरं आमच्याबरोबर गावात फिरत होती. त्यापैकी सातवीतल्या राहुलला आम्ही विचारलं. तो म्हणाला, ''मला दिल्लीला आयटी कंपनीत नोकरी करायची आहे.'' त्याला कॉम्पुटरची आवड होती आणि चक्रातालाा त्याने क्लासही लावला होता. इतर दोघांनाही दिल्लीलाच जायचं होतं. दहावीतल्या मोहितला वायुसेनेत प्रवेश हवा होता, तर पाचवीतील प्रांजलीला चक्क सिनेमात काम करायचं होतं!

मोहनामध्ये इतर सोई नसल्या तरी बहुतेक सगळ्यांकडे डिश टीव्ही आहे. त्यामुळे त्या टीव्हीतून दिसणाऱ्या शहरांमध्ये राहायला जावं असं लहान मुलांना वाटतं. सध्याही मोहना आणि आसपासच्या गावांमध्ये वयस्कर माणसं आणि शाळकरी मुलंच जास्त दिसतात. तरुण माणसं शहराच्या ओढीने बाहेर जातात. आम्ही बोलत होतो त्या मुलांचाही तोच विचार होता. मोहनामधले कष्ट बघता त्यांना तसं वाटणं साहजिकच होतं म्हणा. पण मग इथे असणारी शांतता-इथला निसर्ग-इथला निवांतपणा-इथली स्वच्छ हवा त्यांना शहरात कशी मिळणार?

मोहनाचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलो तेव्हा वाटलं, आणखी काही वर्षांनी इथे आलो तर हे गाव असेल का? की थंडीत खोया-छानीला जातं तसं सारंच्या सारं गाव शहराकडे गेलं असेल?

■ गुरुदास नूलकर
९८२२०३४५७९
gurudasn@gmail.com